**Q.P. Code:00000030**

**[वेळ: ३ तास]** **[ गुण:१०० ]**

**कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.**

**सूचना: १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.**
**२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.**
**३. प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात.**

**प्र.१** कवितेच्या विविध व्याख्या सांगून कवितेचे स्वरूप स्पष्ट करा. **(२०)**

**किंवा**

कवितेची वैशिष्ट्ये सांगून कवितेचे विविध प्रकार स्पष्ट करा.

**प्र.२** 'निवडक मराठी कविता' मधील बा.सी. मर्ढेकर यांच्या कवितांचा आढावा घ्या. **(२०)**

किंवा

कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतून येणारे स्त्री -जीवन स्पष्ट करा.

**प्र.३** 'निवडक मराठी कविता' मधील इंद्रजित भालेराव यांच्या कवितेतून ग्रामीण जीवनाचे दर्शन होते, हे त्यांच्या कवितेतून स्पष्ट करा. **(२०)**

**किंवा**

'निवडक मराठी कविता' मधील अनुराधा पाटील यांच्या कवितांचा आढावा घ्या.

**प्र.४** **प्रत्येक गटातील एक टीप लिहा.** **(३०)**

**अ) १.** मराठी कवितेची परंपरा

**किंवा**

**२.** कविता एक साहित्यप्रकार

**Q.P. Code:00000030**

**ब) १.** कवी मंगेश पाडगावकर यांच्या कविता

**किंवा**

**२.** पद्मा गोळे यांच्या कवितेतील स्त्री-जीवन

**क) १.** अरुण काळे यांच्या कवितेतील दलित जाणीव

**किंवा**

**२.** कवयित्री अनुराधा पाटील यांच्या कविता

**प्र.५ पुढील वस्तुनिष्ठ प्रश्न सोडवा. (कोणतेही १०) (१०)**

१. नवकाव्याचे जनक कोणास म्हणतात?

२. 'प्रेम म्हणजे प्रेम असते' तुमचं आमचं अगदी सेम असतं', असे कोणत्या कवीने म्हटले आहे?

३. बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यसंग्रहाचे नाव सांगा?

४. मानवी मनाच्या सैरभैर वर्तनावर नेमकेपणाने बोट ठेवणारी 'मन' ही कविता कोणाची आहे.

५. प्रिय व्यक्तीचा वियोग किंवा मृत्यू, नैसर्गिक आघात यामुळे जीवन शोकात्म झाल्याची भावना कोणत्या गीतप्रकारातून व्यक्त केली जाते?

६. धृपद आणि चार चरणांची कडवी अशी रचना कोणत्या काव्यप्रकाराची असते?

७. 'आम्ही कुलीनांच्या कन्या' ही कविता कोणाची आहे?

८. 'मी इथली' ही कविता पद्मा गोळे यांची कोणत्या काव्यसंग्रहातील आहे?

९. कवयित्री अनुराधा पाटील यांच्या कोणत्याही दोन कवितांची नवे सांगा?

१०.'पीकपाणी' हा पहिला कवितासंग्रह कोणत्या कवीचा आहे?

११.'वय वाढत जातयं आपलं', 'जोतीराव फुल्यांचं चित्र' या कविता कोणत्या कवीच्या आहेत?

१२. कवी 'अरुण काळे' यांच्या कोणत्याही दोन कवितांची नावे लिहा?